**प्रेस नोट** दिनांक ०२/०८/२०२१

ओ.सी.अप्राप्त इमारतीसाठी नवीन नळजोडणी मंजूर करण्यासाठी यातील फिर्यादी यांचेकडे रु. २,५०,०००/– इतक्या लाचेची मागणी करुन नमुद रक्कमेचा पहिला हप्ता म्हणून रु. १,००,०००/– स्विकारले व ते स्विकारण्यास अपप्रेरणा दिली म्हणून गुन्हा नोद

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ब हन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ३२/२०२१ |
| ३ | कलम | कलम ७, १२ भ्र.प्र अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | १) सचिन गणपत खोदडे, वय ३९ वर्षे, धंदा – नोकरी (दुय्यम अभियंता) वर्ग–२<br>२) विश्वंभर प्रल्हादराव शिंदे, वय २८ वर्षे, धंदा – नोकरी (कनिष्ठ अभियंता) वर्ग–३<br>नेमणुक ई वार्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, भायखळा, मुंबई. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | **रुपये २,५०,०००/–** |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | **रुपये १,००,०००/–** |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | **रुपये १,००,०००/–** |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी हे एका विकासकाकडील परवानाधारक प्लंबरकडे अंडर लायसन्स प्लबंर म्हणून काम करतात. फिर्यादी काम करत असलेल्या विकासकाला एका इमारतीचे पुर्नविकासाचे काम मिळाले असुन नमुद इमारतीस ओ.सी. नसल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातुन नळजोडणीच्या कामासाठी त्या इमारतीत राहणाऱ्या भाडेकरुंनी ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, भायखळा, मुंबई येथे अर्ज केला होता. सदर अर्जाचा फिर्यादी हे पाठपुरावा करत होते. नमुद नळजोडणी संदर्भातील पी फॉर्म मिळण्यासाठी फिर्यादी हे दिनांक २८/०७/२०२१ रोजी आलोसे क्र. २ विश्वंभर प्रल्हादराव शिंदे, कनिष्ठ अभियंता यांना भेटले असता, त्यांनी फिर्यादी यांचेकडे रु. २,००,०००/– इतक्या लाचेची मागणी केली होती.<br>फिर्यादी यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/०७/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे समक्ष हजर राहुन तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीस अनुसरुन दिनांक ३१/०७/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान यातील आलोसे क्र. २ यांनी फिर्यादी यांचेकडुन रु. २,००,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले व मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. १,००,०००/– सोमवारी दिनांक ०२/०८/२०२१ रोजी घेवून येण्यास सांगितले.<br>दिनांक ०२/०८/२०२१ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान फिर्यादी हे आलोसे क्र. १ यांना भेटले असता, त्यांनी फिर्यादी यांना आलोसे क्र. २ यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी हे आलोसे क्र. २ यांना भेटल्यानंतर, आलोसे क्र. २ हे पुन्हा आलोसे क्र.१ यांना भेटुन आले व फिर्यादी यांच्याकडे आलोसे क्र. १ व स्वत:साठी रु. २,५०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे आलोसे क्र.२ यांनी फिर्यादी यांचेकडुन पाहिला हप्ता म्हणून १,००,०००/– स्विकारला असता, त्यांना रंगेहात पकडण्यात आले व आलोसे क्र. १ यांनी गुन्हा करण्यास अपप्रेरणा दिली म्हणून वरील नमुद दोन्ही आलोसेंविरुध्द वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

( हेमंत सावंत ) २/८/२१.
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिति असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ – acbmaharastra.gov.in"
ईमेल – १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार अर्ज–www.acbmaharastra.net.टोलफि. क. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००